नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २३४ | Issue - 234 | वार मंगळवार दि. १३ जानेवारी २०२६ | Blow- Tuesday Date 13 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## अक्कलकोट नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाचा पदभार मिलन दादा कल्याणशेट्टी स्वीकारले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी साहेब, भाजपा अध्यक्ष श्री. जे. पी. नड्डाजी, महाराष्ट्राचे लाडके व यशस्वी मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब, प्रदेशाध्यक्ष मा. श्री. रविंद्रजी चव्हाण साहेब, ग्रामविकास तथा पालकमंत्री श्री. जयकुमारजी गोरे साहेब यांच्या आशीर्वादाने आणि आपले 'विकासरत्न' लोकप्रिय आमदार आदरणीय सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या खंबीर पाठिंब्यामुळे व विश्वासामुळे तसेच कार्यकर्त्यांची अतोनात मेहनत आणि जनतेचा संपूर्ण विश्वास यांच्या जोरावर आज मी अक्कलकोट नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला. असे नूतन अध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी यांनी म्हणाले

यावेळी उपनगराध्यक्ष पदी श्री. ऋतुराज राठोड यांची निवड करण्यात आली. श्री स्वामी समर्थांच्या कृपेनेच मला जनतेची सेवा करण्याचे हे परमभाग्य लाभले आहे.

माझ्यासाठी हा अत्यंत भावनिक क्षण आहे. जबाबदारीच्या जाणिवेसोबतच, भारतीय जनता पार्टीमध्ये काम करताना एका सामान्य कार्यकर्त्याला इतकी मोठी संधी मिळू शकते, हा विश्वास आज पुन्हा एकदा सार्थ ठरला आहे.

अक्कलकोट शहराचा 'प्रथम नागरिक' म्हणून, काम करत असताना मी नगराध्यक्ष नव्हे तर जनतेचा सेवक म्हणूनच काम करेन व आपल्या अक्कलकोटला राज्यात प्रथम क्रमांकाचे शहर बनवण्यासाठी मी पूर्ण ताकदीने प्रयत्न करेन.

या कार्यात जनतेच्या रास्त अपेक्षा आणि सूचनांचे मी सदैव स्वागत करेन. शहराच्या विकासासाठी सर्व नगरसेवकांना सोबत घेऊनच काम करण्याचा व काही नाविन्यपूर्ण कल्पना राबवण्याचा माझा मानस आहे. तुम्हा सर्वांची साथ आणि आमचे प्रामाणिक प्रयत्न यातून आपण सर्वसामान्यांची स्वप्ने नक्कीच पूर्ण करू, असा विश्वास या मंगलसमयी व्यक्त करतो.

यावेळी लोकप्रिय आमदार श्री. सचिन दादा कल्याणशेट्टी, प्रदेश कार्यकारणी सदस्य श्री. शहाजी भाऊ पवार, श्री. अमोलराजे भोसले,श्री. मुख्याधिकारी श्री. रमाकांत डाके, मल्लिनाथ कल्याणशेट्टी सर, श्री. सिध्देश्वर कल्याणशेट्टी सर, पक्षनेता श्री. यंशवत घोंगडे, श्री. महेश हिडोळे, श्री. महेश इंगळे, श्री. मनोज कल्याणशेट्टी, श्री. सागर कल्याणशेट्टी, शहर मंडल अध्यक्ष श्री. प्रदिप पाटील श्री. शिवशरण जोजन, श्री. मल्लिनाथ स्वामी, श्री. प्रभाकर मजगे, श्री. शिवशरण वाले, श्री. नन्नु कोरबु, श्री. मल्लिनाथ अळगी, श्री. विक्रम शिंदे व सर्व नूतन नगरसेविका, नगरसेवक व नगरपरिषद कर्मचारी वृंद उपस्थित होते.

### अक्कलकोट नगरपरिषद उपनगराध्यक्षपदी बंटी राठोड

**अक्कलकोट नगरपरिषदेचे नूतन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांचा पदग्रहण सोहळा नगरपरिषद कार्यालयात पार पडला. याच वेळी ऋतुराज (बंटी) राठोड यांची उपनगराध्यक्षपदी निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिक सेवा, पारदर्शक कारभार आणि नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याची बांधिलकी व्यक्त केली. या नव्या नेतृत्वाकडून पायाभूत सुविधा, नागरी सेवा आणि विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.**

# जिल्हा परिषद निवडणुकांसाठी अतिरिक्त १५ दिवसांची मुदतवाढ

## राज्य निवडणूक आयोगाच्या मागणीला सुप्रीम कोर्टाकडून नवी मुदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांबद्दल मोठ्या प्रमाणात घोळ सुरू होता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित असलेल्या निवडणुका ३१ जानेवारीपूर्वी घेण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाकडून देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर, नगर पंचायती आणि नगर परिषदांच्या निवडणुका वेळेत पूर्ण झाल्या असून महानगरपालिकांच्या निवडणुकाही वेळेत पार पडत आहेत. अशात यंत्रणा अपुरी असल्याने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी अतिरिक्त १५ दिवसांची मुदतवाढ द्यावी, अशी मागणी राज्य निवडणूक आयोगाकडून सुप्रीम कोर्टाकडे करण्यात आली होती. कोर्टाने आज आयोगाला मोठा दिलासा देत ही मागणी मान्य केली आहे. त्यामुळे ज्या जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडण्यात आलेली नाही, तेथील निवडणुका या पुढील महिनाभरात पार पडणार आहेत.

राज्यातील एकूण ३२ जिल्हा परिषदांपैकी २० जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडण्यात आली आहे. त्यामुळे या २० जिल्हा परिषदा वगळून इतर १२ ठिकाणी पुढील काही दिवसांत निवडणूक कार्यक्रम घोषित होण्याची शक्यता आहे. तसंच जिथं आरक्षण मर्यादा ओलांडण्यात आलेली नाही अशा १२५ पंचायत समित्यांचीही निवडणूक जाहीर होणार आहे. तर आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.



फेब्रुवारी आणि मार्चमध्ये दहावी-बारावीच्या परीक्षा असल्याने या काळात निवडणुका घेतल्या जात नाहीत. त्यामुळे ज्या ठिकाणी ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडण्यात आली आहे तेथील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका एप्रिल किंवा मे महिन्यात होण्याची शक्यता आहे. ज्या जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची टक्केवारी ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे, तिथे या आठवड्यातच निवडणुकांची घोषणा होऊन फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापूर्वी त्या पार पडतील.

## अजित पवारांना दे धक्का, राष्ट्रवादीचा उमेदवारच भाजपात; राजकीय वर्तुळात खळबळ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत मतदानाला अवघे तीन दिवस शिल्लक असताना भाजपने (इगझ) मोठी खेळी खेळली आहे. सोलापूर शहरातील प्रभाग क्रमांक ९ ड मधील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे (छउझ क्षळीं झुरी ऋरलींळेप) अधिकृत उमेदवार तुषार जक्का यांनी थेट भाजपमध्ये प्रवेश केल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

तुषार जक्का यांचा भाजपमध्ये प्रवेश पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या उपस्थितीत पार पडला. ऐन निवडणुकीच्या तोंडावर झालेल्या या प्रवेशामुळे प्रभाग क्रमांक ९ ड मधील राजकीय गणिते पूर्णपणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रभागात भाजपचे उमेदवार मेघनाथ येमूल, राष्ट्रवादी काँग्रेसचे तुषार जक्का आणि शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार सुरेश गायकवाड यांच्यात तिरंगी लढत रंगणार होती.

मात्र राष्ट्रवादीच्या अधिकृत उमेदवाराने भाजपमध्ये प्रवेश केल्याने ही लढत आता एकतर्फी होण्याची चर्चा सुरू झाली आहे. भाजपने ऐनवेळी राष्ट्रवादीचा उमेदवार आपल्या गोटात घेतल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला असून, विरोधकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. तर भाजप समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. मतदानापूर्वीच घडलेल्या या घडामोडीमुळे सोलापूरच्या राजकारणात आणखी नाट्यमय वळण लागले आहे.

दरम्यान, सोलापूर महानगरपालिकेची रणधुमाळी सध्या राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहे. एकीकडे भाजपमध्ये अंतर्गत बंडखोरीचे सूर स्थानिक आमदारांकडून ऐकू येत आहेत, तर दुसरीकडे महाविकास आघाडीत जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर झाल्यानंतर अनेक इच्छुक उमेदवारांमध्ये नाराजी पसरली आहे. सकाळी एका पक्षात असलेले नेते संध्याकाळपर्यंत दुसऱ्या पक्षात जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या सततच्या राजकीय उलथापालथीत सर्वसामान्य सोलापूरकर मात्र पुरता हैराण झाला आहे.

प्रत्येक राजकीय नेता आपला स्वार्थ साधण्यात व्यस्त असताना, सोलापूरच्या विकासाची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या एकूण १०२ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. २०१७ च्या निवडणुकीत भाजपने १०२ पैकी ४९ जागांवर विजय मिळवला होता. त्यानंतर शिवसेनेला २१, काँग्रेसला ११, एमआयएमला ९, राष्ट्रवादी काँग्रेसला ४, बसपाला ४ आणि माकपला १ जागा मिळाली होती. आता २०२६ च्या सोलापूर महापालिका निवडणुकीत कोण बाजी मारणार, याचा फैसला येत्या १६ जानेवारीला होणार आहे.

**श्री सिद्धेश्वर महायात्रा २०२६**

**सोलापूर महापालिका व मंदिर समितीने मंदिर परिसर व होम मैदान सीसीटीव्ही च्या नियंत्रणाखाली ठेवावा**

# प्रशासन व मंदिर समिती यांनी परस्पर समन्वयातून भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : सोलापूर शहरात दिनांक १२ ते १६ जानेवारी २०२६ या कालावधीत श्री सिद्धेश्वर महायात्रा होत आहे, यानिमित्त श्री सिद्धेश्वराच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. त्या अनुषंगाने प्रशासन, सोलापूर महानगरपालिका व श्री सिद्धेश्वर मंदिर समिती यांनी परस्पर समन्वयातून भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात व ही महायात्रा यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित श्री सिद्धेश्वर महायात्रा २०२६ च्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, श्रीमती विना पवार, सोलापूर शहर पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, महायात्रा इन्सीडेंट कमांडर तथा शहर अभियंता श्रीमती सारिका आकुलवार, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे यांच्यासह अन्य संबंधित विभाग प्रमुख तसेच पंच कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

**■ आरोग्य विभागाने होम मैदान व मंदिर परिसरात आरोग्य पथके सुसज्ज ठेवावीत**
**■ होम मैदानावरील विविध स्टॉल, व्यासपीठ तसेच मनोरंजनासाठी आलेल्या विविध साधनसामग्रीचे फिटनेस सर्टिफिकेट शासकीय यंत्रणेकडून उपलब्ध करून घ्यावे**
**■ दिनांक १२ ते १६ जानेवारी २०२६ या कालावधीत श्री सिद्धेश्वर महायात्रा होत आहे**
**■ महा यात्रा कालावधीत नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांना फिचर फोन जलद संपर्कासाठी उपलब्ध करून द्यावेत**



जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, सोलापूर महानगरपालिका व मंदिर समितीने यात्रा कालावधीत कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडणार नाही या दृष्टीने आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. मंदिर परिसर तसेच होम मैदान संपूर्ण सीसीटीव्ही च्या नियंत्रणाखाली असले पाहिजे यासाठी आवश्यक त्या ठिकाणी कॅमेरे बसवून घ्यावेत. पोलीस विभागाने संपूर्ण यात्रा कालावधीत संपूर्ण सोलापूर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील या दृष्टीने पोलीस बंदोबस्त ठेवावा तसेच गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वाहतूक नियंत्रण बिनचूक होऊन भाविकांना कोणत्याही त्रास होणार नाही यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देशही यावेळी त्यांनी दिले.

मंदिर परिसर, होम मैदान या ठिकाणी जे विविध प्रकारचे स्टॉल लागणार आहेत तसेच मनोरंजनाचे साहित्य उभारले जाणार आहेत त्या सर्वांची तपासणी तसेच फिटनेस सर्टिफिकेट शासकीय यंत्रणेकडून घेण्याची कार्यवाही सोलापूर महानगरपालिकेने करावी. तसेच प्रत्येक स्टॉलला देण्यात येणारे वीज जोडणी याचीही तपासणी विद्युत निरीक्षक यांच्याकडून करून घ्यावी. अग्निशामन दलाने अग्नी प्रतिबंध साहित्य मंदिर व होम मैदान परिसरात ठेवावे तसेच होम मैदानावरील स्टॉल धारकांना याबाबतचे प्रशिक्षण ही द्यावे अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. महापालिका आरोग्य विभागाने मंदिर परिसर व मैदानात आवश्यक त्या ठिकाणी आरोग्य पदके वैद्यकीय उपकरण व औषधासह सुसज्ज ठेवाव्यात. म्बुलन्स तसेच आयसीओ सेंटर ही तयार ठेवावेत. वैद्यकीय दृष्ट्या एखादी इमर्जन्सी आल्यास तात्काळ पोलीस विभागाशी संपर्क साधून त्यादृष्टीने नियोजन आराखडा तयार करावा यासाठी पोलीस विभागाची मदत घ्यावी. तसेच इन्सिडेंट कमांडर यांनी त्यांच्या अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांशी संवाद साधण्यासाठी टू जी सेवा देणारा फीचर फोन खरेदी करावा त्यामुळे संपर्क करण्यास अडथळा येणार नाही. तसेच उप इन्सिडेंट कमांडर म्हणून मंदिर परिसर होम मैदान तसेच प्रदक्षिणा मार्गावर मुख्याधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्याच्या दृष्टीने नगरपालिका प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवावा, असेही निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

अन्न व औषध प्रशासनाने त्यांनी तयार केलेल्या ९ पथकाच्या माध्यमातून यात्रा कालावधीत होम मैदान तसेच शहराच्या विविध परिसरात लावण्यात आलेल्या फुल स्टॉलची तपासणी करावी. भेसळ करणाऱ्या वर त्वरित कठोर कारवाई करावी असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्याकडील तीन बोटी मंदिर समितीकडे साहित्य व मनुष्यबळासह उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे मंदिर परिसरातील तलावात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. या प्रकारे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदे अंतर्गत यात्रा कालावधीत करावयाच्या विविध उपाय योजनांचा आढावा सोलापूर महानगरपालिका तसेच पंच कमिटी कडून घेतला तसेच आवश्यक त्या ठिकाणी मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

प्रारंभी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे तसेच इन्सिडेंट कमांडर श्रीमती आकुलवार यांनी यात्रा यशस्वी करण्यासाठी महापालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. तसेच पंच कमिटीचे सदस्य यांनी मंदिर समितीच्या वतीने भाविकांसाठी देण्यात आलेल्या सोयी सुविधांची माहिती दिली.

## संपादकीय....

### यात्रेचा आढावा

सोलापूर शहरात दिनांक १२ ते १६ जानेवारी २०२६ या कालावधीत श्री सिद्धेश्वर महायात्रा होत आहे, यानिमित्त श्री सिद्धेश्वराच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. त्या अनुषंगाने प्रशासन, सोलापूर महानगरपालिका व श्री सिद्धेश्वर मंदिर समिती यांनी परस्पर समन्वयातून भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात व ही महायात्रा यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण चे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी यात्रेचा आढावा घेतला. सोलापूर महानगरपालिका व मंदिर समितीने यात्रा कालावधीत कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडणार नाही या दृष्टीने आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. मंदिर परिसर तसेच होम मैदान संपूर्ण सीसीटीव्ही च्या नियंत्रणाखाली असले पाहिजे यासाठी आवश्यक त्या ठिकाणी कॅमेरे बसवून घ्यावेत. पोलीस विभागाने संपूर्ण यात्रा कालावधीत संपूर्ण सोलापूर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील या दृष्टीने पोलीस बंदोबस्त ठेवावा तसेच गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वाहतूक नियंत्रण बिनचूक होऊन भाविकांना कोणत्याही त्रास होणार नाही यासाठी प्रयत्न करावेत. मंदिर परिसर, होम मैदान या ठिकाणी जे विविध प्रकारचे स्टॉल लागणार आहेत तसेच मनोरंजनाचे साहित्य उभारले जाणार आहेत त्या सर्वांची तपासणी तसेच फिटनेस सर्टिफिकेट शासकीय यंत्रणेकडून घेण्याची कार्यवाही सोलापूर महानगरपालिकेने करावी. तसेच प्रत्येक स्टॉलला देण्यात येणारे वीज जोडणी याचीही तपासणी विद्युत निरीक्षक यांच्याकडून करून घ्यावी. अग्निशामन दलाने अग्नी प्रतिबंध साहित्य मंदिर व होम मैदान परिसरात ठेवावे तसेच होम मैदानावरील स्टॉल धारकांना याबाबतचे प्रशिक्षण ही द्यावे अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. महापालिका आरोग्य विभागाने मंदिर परिसर व मैदानात आवश्यक त्या ठिकाणी आरोग्य पदके वैद्यकीय उपकरण व औषधासह सुसज्ज ठेवाव्यात. म्बुलन्स तसेच आयसीओ सेंटर ही तयार ठेवावेत. वैद्यकीय दृष्ट्या एखादी इमर्जन्सी आल्यास तात्काळ पोलीस विभागाशी संपर्क साधून त्यादृष्टीने नियोजन आराखडा तयार करावा यासाठी पोलीस विभागाची मदत घ्यावी. तसेच इन्सिडेंट कमांडर यांनी त्यांच्या अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांशी संवाद साधण्यासाठी टू जी सेवा देणारा फीचर फोन खरेदी करावा त्यामुळे संपर्क करण्यास अडथळा येणार नाही. अन्न व औषध प्रशासनाने त्यांनी तयार केलेल्या ९ पथकाच्या माध्यमातून यात्रा कालावधीत होम मैदान तसेच शहराच्या विविध परिसरात लावण्यात आलेल्या फुल स्टॉलची तपासणी करावी. भेसळ करणाऱ्या वर त्वरित कठोर कारवाई करावी असे निर्देश देण्यात आले.

# शब्दांना वेग देणारा विचारवंत : सर आयझॅक पिटमॅन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आजच्या वेगवान डिजिटल युगात 'टायपिंग', 'रेकॉर्डिंग', 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' या शब्दांचा उच्चार सहज होतो. मात्र या आधुनिक साधनांच्या कितीतरी आधी, मानवी विचारांना वेग देणारे, शब्दांना शिस्तबद्ध रूप देणारे आणि कार्यालयीन व्यवस्थेला नवे आयाम देणारे एक महान संशोधक होऊन गेले, ते लघुलिपीचे जनक सर आयझॅक पिटमॅन. त्यांचा जन्मदिन म्हणजे केवळ एका संशोधकाची आठवण नव्हे, तर ज्ञान, कष्ट आणि संधी यांच्या ऐतिहासिक संगमाचे स्मरण होय. इंग्लंडमधील ट्रॉब्रिज, विल्टशायर येथे जन्मलेल्या सर आयझॅक पिटमॅन यांनी विकसित केलेली लघुलिपी ही केवळ लेखनपद्धती नव्हती; तर ती एक क्रांती होती. माणसाच्या विचारांच्या गतीला कागदावर उतरविण्याचे सामर्थ्य त्यांच्या लघुलिपीत होते. एखाद्या कार्यालय प्रमुखाच्या, न्यायाधीशाच्या किंवा वक्त्याच्या तोंडून निघणारा प्रत्येक शब्द अचूक, त्वरित आणि शिस्तबद्ध पद्धतीने नोंदवता येणे, ही त्या काळातील अभूतपूर्व बाब होती.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

कार्यालयीन कामकाज म्हणजे आज ज्या गतीने ई-मेल, नोट्स, मिनिट्स तयार होतात, त्याची बीजे पिटमॅन यांच्या लघुलिपीतच दडलेली होती. निर्णय प्रक्रिया, प्रशासकीय नोंदी, न्यायालयीन कामकाज आणि पत्रकारिता, या सर्व क्षेत्रांना लघुलिपीने नवे बळ दिले. शब्द फक्त ऐकायचे नाहीत, तर ते जपायचे आणि जतन करायचे असतात, ही जाणीव पिटमॅन यांच्या कार्यातून ठळकपणे पुढे आली. संगणक, मोबाईल आणि व्हॉइस-टू-टेक्स्टच्या युगात लघुलिपी हळूहळू मागे पडत असली, तरी अवघ्या पाच-सहा दशकांपूर्वी लघुलेखन आणि टंकलेखन ही लाखो मध्यमवर्गीय युवकांची जीवनरेषा होती. अत्यल्प खर्चात, कमी कालावधीत शिकता येणारे हे कौशल्य अनेकांच्या हाताला काम देणारे ठरले. सरकारी व खासगी कार्यालयांमध्ये 'लघुलेखक' ही पदे केवळ नोकरी नव्हती, तर सामाजिक प्रतिष्ठा आणि स्थैर्याची हमी होती. या लघुलिपीच्या बळावर अनेकांनी नोकरी करत शिक्षण पूर्ण केले, पुढे अधिकारी झाले, काहींनी प्रशासनात उच्च पदे भूषवली, तर काहींनी पत्रकारिता व न्यायव्यवस्थेत मोलाची भूमिका बजावली. ही सारी यशोगाथा म्हणजे सर आयझॅक पिटमॅन यांच्या संशोधनाची जिवंत साक्ष आहे.

१९८६ पर्यंत त्यांच्या लघुलिपीवरील पुस्तकांच्या दहा लाखांहून अधिक प्रती विकल्या जाणे, ही केवळ व्यावसायिक यशाची आकडेवारी नव्हे, तर त्यांच्या कार्याची जागतिक स्वीकारार्हता दर्शविणारी बाब आहे. शिक्षणशास्त्राच्या क्षेत्रात ते एक नावाजलेले संशोधक, प्रभावी शिक्षक आणि दूरदृष्टीचे प्रकाशक म्हणून ओळखले गेले. आज प्रश्न असा आहे की, आपण प्रगत तंत्रज्ञानाच्या झगमगाटात मूलभूत कौशल्यांचे महत्त्व विसरत तर नाही ना? लघुलिपी आज मागे पडत असली, तरी शिस्त, अचूकता, एकाग्रता आणि श्रवणशक्ती ही मूल्ये तितकीच महत्त्वाची आहेत. पिटमॅन यांची लघुलिपी आपल्याला केवळ वेगवान लेखन शिकवत नाही, तर विचार ऐकण्याची, समजून घेण्याची आणि जतन करण्याची संस्कृती शिकवते.

सर आयझॅक पिटमॅन यांचे पुण्यस्मरण केवळ एका संशोधकाचा गौरव नाही, तर ज्ञानाच्या साधेपणातून संधी निर्माण होऊ शकतात, याचा आत्मविश्वास देणारा दिवस आहे. शब्दांना वेग देणाऱ्या या विचारवंताचे योगदान काळाच्या ओघात बदलले, तरी त्यामागील तत्त्वज्ञान आजही तितकेच जिवंत आणि प्रेरणादायी आहे. मी स्वतः एक वरिष्ठ लघुलेखक असल्याने शब्दांना वेग, विचारांना शिस्त, संधींना दिशा देणाऱ्या आणि शब्द जतन करण्याची संस्कृती घडवणाऱ्या लघुलिपीचे जनक सर आयझॅक पिटमॅन यांना पुण्यतिथीनिमित्त कृतज्ञ स्मरण..

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने उमा महाविद्यालय, पंढरपूर येथे समर्पण दिवस साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारतातील युवकाचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद तसेच स्वराज्य संकल्पक राजमाता जिजाऊ यांची जयंती समर्पण दिवस म्हणून साजरी करण्यात आली.



याप्रसंगी राजमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. देशपांडे यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रांत. सहसचिव दीपक इरकल यांनी राजमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांचे जीवन चरित्र आणि ग्राहक चळवळीचा सिद्धांत याविषयी मार्गदर्शन केले. प्रांत सदस्य. विनोद भरते यांनी अखिल भारतीय ग्राहक पंचायत चे कार्यपद्धती आणि आजच्या काळात या चळवळीची गरज या विषयावर मार्गदर्शन केले.

उमा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर धीरज कुमार बाड यांनी अध्यक्ष भाषण केले व राजमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्रातून प्रेरणा घेण्याची आव्हान केले.

या कार्यक्रमासाठी उमा महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, विद्यार्थी विद्यार्थिनी, मोठ्या संख्येने उपस्थित होते, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा सचिव श्री सुवास निघते तालुकाध्यक्ष श्री नंदकुमार देशपांडे तालुका सहसचिव आझाद अल्लापुरकर उपस्थित होते व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक देशपांडे यांनी केले.

# नामांतराची मागणी करणारे प्रा.डॉ. मच्छिंद्र वाहूळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यात यावे अशी मागणी सर्वप्रथम ज्येष्ठ विचारवंत प्रा.डॉ. मच्छिंद्र वाहूळ यांनी ५२ वर्षांपूर्वी केली होती. आज, १४ जानेवारी नामविस्तार दिन त्यानिमित्ताने...

आंबेडकरी चळवळीच्या इतिहासात मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी अनेक वर्षे मराठवाड्यात धुमसत होती. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी सर्वप्रथम कोणी केली, या संदर्भात अनेक दावे-प्रतिदावे आहेत. सर्वप्रथम ही मागणी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या काळात पुढे आली. मराठवाडा रिपब्लिकन विद्यार्थी संघाने २६ जून १९७४ रोजी आपल्या मागणीचे एक निवेदन मुख्यमंत्र्यांना सादर केले होते. सहा मागण्याच्या या निवेदनात विद्यापीठाचे नामकरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ करावे अशी एक मागणी होती. ही मागणी मराठवाड्याचे विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. मच्छिंद्र वाहूळ यांनी ५२ वर्षापूर्वी केली होती.

# माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त कळंब नगरपरिषद शाळेस भेट; नवीन इमारत लवकरच उभारणार : नगराध्यक्ष सुनंदाताई कापसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब: प्रतिनिधि , कळंब येथील नगर परिषद शाळा क्रमांक १ या शाळेत माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमास कळंबच्या नगराध्यक्ष सौ. सुनंदाताई कापसे यांनी उपस्थिती लावली. या वेळी त्यांनी नगरपरिषद शाळा क्र १ ची नवीन व भव्य इमारत लवकरच बांधून देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. या घोषणेमुळे शिक्षक, विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी नगराध्यक्ष सौ. सुनंदाताई कापसे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नवनियुक्त नगरसेवक अतुल कवडे, मोहसीन मिर्झा, रुकसाना बागवान,वनमाला वाघमारे व व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शाहीन शेख उपस्थित होते. शाळेच्या वतीने नूतन नगराध्यक्षा सुनंदाताई कापसे व नगरसेवकांचे स्वागत करून सन्मान करण्यात आला. जिजाऊंच्या विचारांचा व संस्कारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्व यावेळी मान्यवरांनी आपल्या भाषणातून अधोरेखित केले.



नगराध्यक्ष सुनंदाताई कापसे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शिक्षणाच्या दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे, नगरपालिकेच्या शाळा ई लर्निंग युक्त करणे, विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे नगरपरिषदेचे प्राधान्य असून नगरपरिषद शाळेची नवीन इमारत उभारण्यासाठी लवकरच आवश्यक कार्यवाही केली जाईल. या कार्यक्रमास शाळेचे शिक्षकवृंद, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका रेजा पायाळ यांनी केले. सूत्रसंचालन अविनाश खरडकर तर आभार प्रदीप सर्जे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष पवळ, युसुफखान पठाण, नारायण बाकले, दशरथ नथाडे, महादेवी झाडे, सुदामती गरड आदींनी परिश्रम घेतले.

# दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालय हार्ट फुलनेस ध्यान योग शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

मंगळवेढा शिक्षण प्रसारक मंडळ मंगळवेढा संचालित दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय मंगळवेढा, येथे रामचंद्र मिशन हर्टफोलनेस ध्यान योग शिबिराचे आयोजन आठ जानेवारी ते १० जानेवारी दरम्यान करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे उपाध्यक्ष डॉक्टर सुभाष कदम, अक्ॅडमी ऍडमिशन डॉक्टर मीनाक्षीताई कदम, अध्यक्ष ॲड सुजित कदम, जुनिअर कॉलेज उप प्राचार्य तथा संचालिका सौ तेजस्विनी कदम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर राजेंद्र गायकवाड संचालक येथे राज वाकळे, इंग्लिश स्कूलचे ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य रवींद्र काशीद आणि मान्यवर उपस्थित होते,



या शिबिराला महाविद्यालयातील प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला व हार्ट फुलनेस ध्यान योग प्रशिक्षक बालाजी शिंदे आणि त्यांचा संघ, यांनी या शिबिरात हार्ट फुलनेस कौटुंबिक स्वास्थ एकात्मता आणि आध्यात्मिक उन्नती आचार हृदयाच्या प्रवास कसा अनुभव आहे तो याचे प्रात्यक्षिक द्वारे मार्गदर्शन केले. या ध्यान शिबिरात शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका प्राध्यापक सौ तेजस्विनी कदम यांनी प्रत्यक्ष सहभाग घेऊन महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग आणि कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन आणि मार्गदर्शन केले आजच्या भौतिकवादी जगात मानसिक संतुलनासाठी ध्यानधारणा अत्यंत गरजेचे आहे असे मत त्यांनी व्यक्त केले त्याचबरोबर प्राचार्य डॉक्टर आर एस गायकवाड यांनी ध्यान शिबिर घेण्यासाठी सहकार्य केले व हे शिबिर यशस्वी होण्यासाठी डॉक्टर बी एस स्वामी यांनी योग संयोजन केले. व हे शिबिर सेमिनार हॉलमध्ये दुपारी १२:३० ते १.३० वेळेत पार पडली

# स्वामीजींच्या कार्याचे स्मरण म्हणून महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेची स्थापना : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : स्वामी विवेकानंद हे आधुनिक भारताच्या वैचारिक पुनर्जागरणाचे महान शिल्पकार होते, त्यांनी भारतीय तत्त्वज्ञान, वेदांत आणि अध्यात्माला जागतिक मान्यता मिळवून दिली, त्यामुळे हिंदू धर्म, तत्त्वज्ञान विकासास चालना मिळाली, म्हणून त्यांच्या कार्याचे सतत स्मरण व्हावे या उद्देशाने पंचप्पा कल्याणशेट्टी यांनी महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेची स्थापना केली असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.




कल्याणशेट्टी शिक्षण संकुलातील मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालय, सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गिरीजामाता मराठी व सेमी इंग्लिश प्राथमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद तसेच राजमाता जिजाबाई यांची जयंती आणि हुतात्मा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सुर्यकांत रूगे उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, स्वामी विवेकानंदांचे विचार अध्यात्मापुरते मर्यादित नव्हते; ते सामाजिक परिवर्तनाचेही प्रबळ समर्थक होते. युवकांमध्ये त्यांनी आत्मविश्वास, शिस्त आणि राष्ट्रभक्ती प्रफुल्लित केली शिक्षण, सेवा आणि मानवकल्याण हे त्यांच्या कार्याचे सूत्र होते . त्यांच्या विचारामुळेच देशाचा आत्मसन्मान आणि आत्मविश्वास वृद्धिंगत झाला त्यामुळेच त्यांचे विचार आज भारतीय समाज जोपासत आहे.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाबाई यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, कुमारी अक्षता साठे हिने राजमाता जिजाबाईच्या वेशभूषा मध्ये होय मी जिजाऊ बोलते यावर भाषण केले. यावेळी इ. ९ वी तील अपेक्षा शिंदे, ऐश्वर्या माळी, प्रीती फुलारी, संस्कृती क्षीरसागर, स्नेहा देडे, अक्षता साठे व धानेश्वरी बगले या मुलीनी पोवाडा सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले, सूत्रसंचालन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार सुर्यकांत रूगे यांनी मानले.

**हुतात्म्यांचे कार्य वंदनीय**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीसाठी प्राणाची आहुती देणारे मल्लप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, श्रीकिशन सारडा, कुर्बान हुसेन यांचे कार्य वंदनीय असून त्यांचा त्याग समाज विसरणार नाही, असे यावेळी आपल्या भाषणातून कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

**जिजाबाईंचे राष्ट्र निर्माणमध्ये उल्लेखनीय योगदान**

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाईंचे जीवन मातृत्व, त्याग, शौर्य आणि राष्ट्रभक्तीचे प्रतीक होते. राष्ट्रनिर्माण मध्ये त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले म्हणूनच आजही आदर्श माता म्हणून त्यांचे नाव आदराने घेतले जाते असे गौरवोद्गार कल्याणशेट्टी यांनी काढले.**

# पंढरपूर आणि मंगळवेढा शहरात अत्याधुनिक क्रीडा संकुलन उभारण्याचा मार्ग मोकळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील पंढरपूर आणि मंगळवेढा शहरामध्ये अत्याधुनिक क्रीडासंकुल मंजूर करण्यात यावे अशी मागणी आमदार समाधाना अवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. या मागणीची तात्काळ दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिल्याने कार्यक्षम आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्यामुळे पंढरपूर आणि मंगळवेढा येथील अत्याधुनिक क्रीडा संकुलन उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून आमदार समाधान आवताडे यांच्या मागणीची दखल**

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील पंढरपूर हे तिर्थक्षेत्र असल्यामुळे लाखो भाविक विठुरायाचे दर्शनसाठी येत असतात. पंढरपूर शहरामध्ये बरेच मैदान हे पार्किंग नावाखाली वापरले जातात. अनेक युवक-युवती स्पर्धा परीक्षा, पोलीस भरतीची तयारी करत असतात. शहरातील व तालुक्यातील मुलांसाठी एकही मैदान किंवा क्रीडांगण नाही. त्यामुळे सरावासाठी अनेक युवकांना बाहेर ठिकाणी जावे लागत आहे. तरी शहरामध्ये अत्याधुनिक क्रीडासंकुल होणे गरजेचे आहे. तसेच मंगळवेढा तालुक्यामध्ये दर्जेदार आणि गुणवंत खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवर अतिशय चांगली कामगिरी केलेली आहे. याबाबत पंढरपूर आणि मंगळवेढा या दोन्हीही शहरांमध्ये सर्व सोयी सुविधा युक्त अत्याधुनिक क्रीडा संकुल उभारण्यात यावे अशी मागणी पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे आमदार समाधान आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. या मागणीची दखल मुख्यमंत्र्यांकडून घेण्यात आली असून संबंधित विभागाला प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्याने कार्यक्षम आमदार समाधान आवताडे यांच्या प्रयत्नांमुळे पंढरपूर आणि मंगळवेढा शहरात लवकरच अत्याधुनिक क्रीडा संकुलन उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीसाठी आमदार अभिजीत पाटील मैदानात

## ही तर कार्यकर्त्यांची निवडणूक त्यांना ताकद देऊन उतणार मैदानात ; भाळवणी, रोपळे, गोपाळपूर, वाखरी गटांमध्ये आमदार अभिजीत पाटील यांनी गावोगावी घेतल्या बैठका



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या काही दिवसांमध्येच निवडणुका लागणार असल्याने पंढरपूर तालुक्यातील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान चेअरमन तथा माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी भाळवणी, रोपळे, गोपाळपूर, वाखरी या गटांतील प्रत्येक गावांमध्ये घोंगडी बैठका घेत कार्यकर्त्यांच्या अडीअडचणी समजून घेत आहेत.

कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण तयार झाले असून आमदार अभिजीत पाटील यांचे गावोगावी जंगी स्वागत करण्यात आले. यामुळे कार्यकर्त्यांना बळ मिळाले असून सर्व ताकदीने आपण निवडणूक लढवणार असल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले आहे.

सध्या आमदार अभिजीत पाटील यांनी गाव दौरे सुरू करून ग्रामीण भागातील नागरिकांच्या अडीअडचणी समजावून घेत आहेत. आपल्यातीलच इच्छुक उमेदवार कोण असावा याबाबतचा चाचपणी करत आहेत. नागरिकांना जो हवा असलेला उमेदवार तोच दिला जाईल.जनतेची कामे करणारा जनतेची सेवा करणारा आपल्यातील युवकांना संधी देण्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

### अभिजीत पाटील आमदार, माढा विधानसभा

**मी जरी माढा मतदारसंघात निवडून आलो असलो तरी विठ्ठल कारखान्याच्या कार्यक्षेत्र हे संपूर्ण पंढरपूर तालुका असून माझ्यासाठी आमदारकीच्या विजयामध्ये रात्रीचा दिवस करणारे त्यांच्यासाठी मी रात्रीचा दिवस करून त्यांच्यासाठी ही निवडणूक लढवणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले. आपल्याच विचाराचा जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य दिल्याने विकास कामांना नक्कीच गती मिळेल.**

गाव दौऱ्याला प्रचंड प्रतिसाद मिळत असून तुम्ही जो उमेदवार द्याल तो आम्हाला मान्य असेल आम्ही त्यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करीन असा शब्दही नागरिकांनी आमदार अभिजीत पाटील यांना यावेळी दिला.

यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अनेक आजी माजी संचालक व भीमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक, विविध सोसायटीचे चेअरमन, ग्रामपंचायतचे सरपंच ग्रामपंचायत सदस्य तंटामुक्त अध्यक्ष गाव पोलीस पाटील अनेक जण यावेळी उपस्थित होते.

# सोलापूर जिल्हयात सण, उत्सव व विशेष दिनादिवशी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास सुट जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : सोलापूर जिल्ह्यात वर्षभरामध्ये साजरा करण्यात येणारे सण, उत्सव व विशेष दिनादिवशी सकाळी ६.०० वाजलेपासून ते रात्री १२.०० वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास सुट जाहिर करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी जारी केले आहेत.

सोलापूर जिल्हयात वर्षभरामध्ये साजरा करण्यात येणारे सण, उत्सव व विशेष दिन पुढीलप्रमाणे,

दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी मकरसंक्रांत व श्री. सिध्दरामेश्वर यात्रा सोलापूर, दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवजयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मिरवणूक सांगता मिरवणूकीचा दिवस, गणपती उत्सवादरम्यान दिनांक १४ सप्टेंबर २०२६ रोजी पहिला दिवस, दिनांक २४ सप्टेंबर २०२६ रोजी दहावा दिवस व दिनांक २५ सप्टेंबर २०२६ रोजी अनंत चतुर्दशी असे ३ दिवस, नवरात्री उत्सवा निमित्त, दिनांक १९ ऑक्टोबर २०२६ रोजी अष्टमी व २० ऑक्टोबर २०२६ रोजी नवमी असे २ दिवस, दिनांक ८ नोव्हेंबर २०२६ रोजी दिपावली लक्ष्मीपूजन १ दिवस, दिनांक २५ डिसेंबर २०२६ रोजी ख्रिसमस १ दिवस उर्वरित ५ दिवस महत्वाच्या कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार देण्यात येईल.


ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ नियम ५ मधील सुधारित उपनियम (३) नुसार त्यासोबत दिलेल्या स्पष्टीकरणात्मक टिप्पणीनुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक इत्यादींच्या वापराबाबत श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी जिल्ह्याच्या निकडीनुसार वर्षामध्ये १५ दिवस निश्चित करुन सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट जाहीर करण्यात आली आहे. सदरचा आदेश हा सोलापूर जिल्हयाचे हद्दीत लागू राहिल, असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# पंढरीतील सर्व सीसीटीव्ही सुरू करा

**नगराध्यक्षांनी दिली पोलीस संकुलातील सीसीटीव्ही केंद्राला अचानक भेट**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सी.सी. टी.व्ही म्हणजे सुरक्षा आणि बेकरीकीसाठी वापरली जाणारी एक व्हिडिओ पाळत ठेवण्यासाठी प्रणाली असून सध्या नगरपरिषदेच्या वतीने पंढरपूर शहरांमध्ये असलेल्या पोलीस संकुल येथील सीसीटीव्ही कंट्रोल रूमला लोकनियुक्त कर्तवृक्ष नगराध्यक्ष डॉक्टर सौ प्रणिता ताई भगीरथ भालके यांनी अचानक भेट दिली त्यावेळी अनेक कॅमेरे बंद असे दिसून आली त्यावेळी सर्व कॅमेरे तात्काळ सुरू करण्याच्या सूचना नगरपालिका प्रशासनात दिलेले आहेत.



### नूतन नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता भालके यांच्या सूचना

या पंढरपूर शहरातील १५७ पैकी ६५ ते ७० कॅमेरे चालू स्थितीत असून शहरातील सर्व कॅमेरे चालू करण्याचे आदेश दिले. यामुळे नूतन नगराच्या कार्यतत्परता यावरून दिसून येत येऊ लागली आहे. नूतन नगराध्यक्ष डॉक्टर पनीतीताई भालके यांनी शहरातील मूलभूत सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने आपली पावले उचललेली आहेत. त्यातही सुरक्षेतेच्या दृष्टीने दृष्टिकोनातून शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे सुरू असणे आवश्यक आहेत. त्यामुळे पोलिसांवरील ताण कमी होऊन नागरिकांच्याही समस्या सोडवण्यात मदत होणार आहे. त्यासाठीच पंढरपूर शहरातील बंद अवस्थेत असलेली सीसीटीव्ही कॅमेरे तात्काळ सुरू करण्यात याव्यात अशा सूचना देण्यात आले आहेत.

# श्री माणकेश्वर वाचनालय राजमाता जिजाऊ आणि विवेकानंद जयंती साजरी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्र जडणघडणीत आणि हिंदवी स्वराज्याच्या उभारणीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती श्री माणकेश्वर वाचनालयात उत्साहात साजरी करण्यात आली. श्री माणकेश्वर वाचनालयाचे संचालक डॉ. महेश बनकर आणि सुनील चिखले यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले.

याप्रसंगी असे माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, हिशोब तपासणी दत्ता काका उगावकर, संचालक डॉ महेश बनकर, सुनील चिखले,माजी संचालक अशोक पगारे, संजय घुमरे साहेब, ग्रंथपाल नितीन बनसोडे, कर्मचारी नंदकुमार पुंड, आरती जंगम, अनिता इस्ते आदी उपस्थित होते.

# जि. प. प्रा. शाळा तांदुळवाडी येथे माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

### सावित्री जिजाऊ–महोत्सवाची ही सांगता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी शाळेत माँ जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती मुख्याध्यापक तथा राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात साजरी करण्यात आली. तसेच सावित्री–जिजाऊ महोत्सवाची ही सांगता करण्यात आली.

याबाबत वृत्त असे की, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी या शाळेने दिनांक ३ जानेवारी ते १२ जानेवारी यादरम्यान सावित्री–जिजाऊ महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी सावित्रीमाई जयंती पासून शाळेत वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. विद्यार्थ्यांचे दोन गटात वर्गीकरण करून सामान्य ज्ञान स्पर्धा, स्मरणशक्ती स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा श्रुतलेखन स्पर्धा, भाषण, वक्तृत्व स्पर्धा अशा विविध स्पर्धा घेऊन त्यामध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक काढले असून या सर्व विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनी मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे, माँ जिजाऊ च्या जयंतीनिमित्त शाळेतील विद्यार्थिनी कुमारी अंकिता अंबुरे व कुमारी ईश्वरी कदम यांनी माँ जिजाऊंच्या वेशभूषेत आज मा



जिजाऊंना वंदन केले तर चिरंजीव मनीष कदम याने स्वामी विवेकानंदाचा वेष परिधान करून अभिवादन केले. यावेळी शाळेतील विद्यार्थी कु आकांक्षा सतीश काळे,सई दगडू डिकले, सार्थक गणेश भालेकर, सोहम यशवंत डिकले, श्रेया दगडू डिकले, ऋजुता गणेश मोरे,प्रज्वल प्रशांत बाकले, ईश्वरी अमोल कदम, सृष्टी गणेश भालेकर, सार्थक सुहास धाबेकर, अल्फिया निजाम शेख ,संघरत्न अश्रुबा राऊत, अंकिता श्रीकृष्ण अंबुरे, आरती धीरज वीर, अनुराग श्याम काळे,जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्रावर आपल्या वाणीतून भाषणातून व कवितेतून मानवंदना दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेतील उपक्रम शिक्षिका श्रीमती अशा पवार यांनी विद्यार्थ्यांकडून जिजाऊ वंदना गाऊन घेतली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सहशिक्षक श्री संतोष मोहिते,सयाजी शिंदे, शापोआ कर्मचारी सौ.रुक्मिणी डिकले, मयुरी डिकले, अंगणवाडी कार्यकर्त्या संगीता काळे,यांनी सहकार्य केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी धनश्री शशिकुमार डिकले यांनी तर आभार प्रदर्शन सहशिक्षिका श्रीमती रसिका आगरकर यांनी मानले.

### दि. १२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत चालणार प्रक्रिया

# प्रथम वर्ष इंजिनिअरिंग, बी.फार्मसी आणि एमबीए प्रवेशासाठी आवश्यक 'सीईटी २०२६' करिता ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये प्रथम वर्ष इंजिनिअरिंग, बी.फार्मसी आणि एम.बी.ए. ला प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेल्या व राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल), मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या 'सीईटी २०२६' या परीक्षेकरिता ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया शनिवार, दि.१० जानेवारी २०२६ पासून ते गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सुरु राहणार आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.





पदवी अभियांत्रिकी, पदवी फार्मसी आणि पदव्युत्तर पदवी असलेल्या एम.बी.ए.च्या प्रवेशाकरीता अत्यंत महत्वपूर्ण समजल्या जाणार्या 'एमएएच–सीईटी २०२६' या परीक्षेसाठी फॉर्म भरण्याची मुदत शनिवार, दि.१० जानेवारी २०२६ पासून ते गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आहे. सदर फॉर्म भरण्याची मोफत सुविधा स्वेरी मध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. याचा इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. शासनाने यंदा नियमात बदल केले असून 'सीईटी २०२६' परीक्षेत पहिल्या प्रयत्नात कमी पर्सेंटाईल मिळाले असतील तर त्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून तो विद्यार्थी आणखी एकदा परीक्षा देवू शकतो. या दोन्ही परीक्षेत ज्या परीक्षेत जास्त पर्सेंटाईल मिळाले असतील त्या परीक्षेच्या गुणपत्रिकेचा लाभ विद्यार्थ्याला प्रवेश प्रक्रियेवेळी घेता येईल म्हणजेच ही 'सीईटी २०२६' परीक्षा दोन वेळी देता येवू शकते. या दोन्ही परीक्षेसाठी शासनाकडून शुल्क देखील आकारले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी सदर फॉर्म भरण्यासाठी येताना आपल्या प्रवर्गानुसार आवश्यक असणारी फी आणि आवश्यक ती कागदपत्रे सोबत आणावी. हे शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरायचे आहे यासाठी शनिवार, दि.१० जानेवारी २०२६ पासून ते गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. सीईटी फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांना स्वतःचा अपार आयडी तयार करून ठेवावा लागेल, तसेच आधार कार्ड, आयडेंटी आकाराचा रंगीत फोटो, एटीएम कार्ड अथवा ऑनलाईन बँकिंगचा लॉगीन आयडी आणि त्याचा पासवर्ड, ओटीपी करिता मोबाईल या महत्वाच्या बाबी आवश्यक असणार आहेत. याबाबत शासनाच्या ु.ारहरलर्शीं.ेस या संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी प्रा. उत्तम अनुसे (मोबा.– ९१६८६५५३६५), बी. फार्मसीसाठी प्रा. आर.एस. नाईकनवरे (मोबा.– ८९९९९७३६२५) तर एम.बी.ए. संदर्भात प्रा. सागर सरीक (मोबा. नंबर– ९८९०४१९०४९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाचा इलेमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेचा १००% निकाल!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य कला संचालनालय, यांच्यामार्फत घेतल्या जाणाऱ्या चित्रकला ग्रेड परीक्षा या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा त्यांना इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत गुण वाढीसाठी त्याचा लाभ मिळावा यासाठी या परीक्षा शासनामार्फत घेतल्या जातात . परवा झालेल्या चित्रकला ग्रेड परीक्षेत तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा एलिमेंट्री चित्रकला ग्रेड परीक्षा व इंटरमिजिएट चित्रकला ग्रेड परीक्षेचा निकाल प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी १००% लागलेला आहे.

एलिमेंट्री परीक्षेसाठी एकूण ३२ विद्यार्थी प्रविष्ट होते .उत्तीर्ण विद्यार्थी – ३२

श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी –१८

इ श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी – १४

*इंटरमिजिएट परीक्षेस बसलेले विद्यार्थी –०४

उत्तीर्ण विद्यार्थी–०४

श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी – ०१

उ श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी –०३

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षक श्री पांचाळ सर, श्रीमती रत्नपारखी मॅडम यांचे संस्थेच्या वतीने व विद्यालयाच्या वतीने विद्यालयाचे प्राचार्य श्रीमान घोडके सर यांनी अभिनंदन केले. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# जि. प.प्रशाला ईटकुर चा चित्रकला ग्रेड परीक्षेत शंभर टक्के निकाल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ईटकुर प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : महाराष्ट्र शासनातर्फे सन २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एलिमेंट्री व इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला यामध्ये जिल्हा परिषद प्रशाला ईटकुर ता.कळंब येथील विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे.

एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड दोन्ही परीक्षेसाठी प्रशालेतून ३६ प्रविष्ट झाले होते. पहिल्या परीक्षेत २६ विद्यार्थी सहभागी होते यात ग्रेड ८, इ ग्रेड १२ व उ ग्रेड ६ विद्यार्थ्यांना मिळाला तर दुसऱ्या परीक्षेत १० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते यात ग्रेड ९ व इ ग्रेड १ विद्यार्थ्यांना मिळाला यातील दुसऱ्या परिक्षेचे सर्व विद्यार्थी इयत्ता १० वी च्या परीक्षेत अतिरिक्त गुणांसाठी पात्र झाले या बद्दल प्रशालेत राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेचे मुख्याध्यापक चंद्रकांत शिंदे सर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हरिदास पावले सर्व शिक्षक बांधव व कर्मचारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करून सर्वांचे अभिनंदन करण्यात आले . याचबरोबर शासकीय कर्मचारी जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम आलेल्या कळंब तालुका विजेता संघातील खेळाडू शिक्षक अनिल शिंदे सर ,काकासाहेब गावकरे सर, राहुल बाबर, सर व एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड या दोन्ही परीक्षेसाठी मार्गदर्शन करणारे शरद आडसुळ सर यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयाचे समाज सेवाकार्यात उल्लेखनीय योगदान : शिवलिंगेश्वर महास्वामीजी

## वागदरी येथील श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : शिबिरार्थी व ग्रामस्थांना देशप्रेम, समाजसेवा कर्तव्य आणि जबाबदारी यांची जाणीव करून देण्यात कल्याणशेट्टी महाविद्यालय यशस्वी झाले असून देशभक्ती वृद्धिंगत करण्यात महाविद्यालयाचे उल्लेखनीय योगदान खूप मोठे आहे असे गौरवोद्गार वागदरी येथील विरक्त मठाचे शिवलिंगेश्वर महास्वामीजी यांनी व्यक्त केले.

वागदरी येथे कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित केले होते. शिबिर समारोप कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर सरपंच शिवानंद घोळसगांव, माजी सरपंच श्रीकांत भैरामडगी, गोगावचे माजी सरपंच प्रदीपजी जगताप, बसवराज शेळके, शरणबसप्पा मंगाणे, कमलाकर सोनकांबळे, प्रदीप पाटील, सुनिल सावंत, श्याम बाबर, असलम मुल्ला, ग्रामपंचायत सदस्य शारदा रोट्टे, जयश्री बटगेरी, कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार उपस्थित होते.



पुढे महास्वामीजी म्हणाले की, एनएसएस श्रमसंस्कार शिबिराअंतर्गत स्वच्छता अभियान, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, ग्राम स्वच्छता, महिला संघटन आदी समाज प्रबोधनपर कार्यक्रम राबविण्यात आले, त्यामुळे मी नाही तर आम्ही या ब्रीदवाक्याची संकल्पना प्रत्यक्ष कृतीत साकारली आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, प्रणाली थोरात व पंचप्पा जाधव यांनी मनोगत व्यक्त केले तर सूत्रसंचलन समर्थ पवार व बापूजी चव्हाण यांनी केले. आभार कार्यक्रमाधिकारी प्रा शितल झिंगाडे-भस्मे यांनी मानले.

### शिबिरार्थी शाश्वत विकास अभियानात यशस्वी

कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वागदरी गावाचा परिसर स्वच्छ केला, समाजसेवेचा आदर्श घालून दिला, त्यामुळे शाश्वत विकासासाठी युवक हे अभियान यशस्वी झाले आहे असे यावेळी सरपंच शिवानंद घोळसगाव यांनी सांगितले.

# सहलीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांचा ऐतिहासिक आणि निसर्गरम्य प्रवास संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील सुपतगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची वार्षिक सहल नुकतीच रायगड, अरेवारे बीच, पावनखिंड आणि महाबळेश्वर अशा प्रेक्षणीय स्थळांना भेट देऊन उत्साहात पार पडली. या सहलीमध्ये शाळेचे विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी झाले होते.

ऐतिहासिक वारशाचा अनुभव

सहलीची सुरुवात 'किल्ले रायगड' दर्शनाने झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची गाथा सांगणारा हा किल्ला पाहून विद्यार्थी भारावून गेले. त्यानंतर 'पावनखिंड' येथे भेट देऊन बाजीप्रभू देशपांडे यांच्या बलिदानाचा इतिहास विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन अनुभवला. या ऐतिहासिक



भेटींमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत झाली. रत्नागिरी जवळील 'अरेवारे बीच'च्या निळ्याशार समुद्राने आणि स्वच्छ किनाऱ्याने सर्वांचे मन जिंकले.गणपती पुळे दर्शन व कोकणच्या निसर्गसौंदर्याचा आनंद लुटल्यानंतर सहलीचा शेवटचा टप्पा 'महाबळेश्वर' हा होता. महाबळेश्वरमधील वेण्णा लेक, ऑर्थर सीट पॉईंट आणि मॅप्रो गार्डनला विद्यार्थ्यांनी भेट दिली. गुलाबी थंडीत स्ट्रॉबेरीचा आस्वाद घेत विद्यार्थ्यांनी सहलीचा मनमुराद आनंद लुटला.

शिस्त आणि अभ्यासपूर्ण नियोजन

सहलीदरम्यान केवळ मजाच नाही, तर भौगोलिक आणि ऐतिहासिक माहितीचे संकलनही विद्यार्थ्यांनी केले. मुख्याध्यापक व्यकट क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली चिदानंद स्वामी, राजेश सूर्यवंशी, पावशेरे, कुलकर्णी शिक्षकांनी या सहलीचे चोख नियोजन केले होते. पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक केले असून, सुरक्षित आणि आनंददायी प्रवासाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

# आदर्श गाव जिरोना येथील शेतकऱ्याचा रस्ता कायमचा केला बंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरी/तालुका प्रतिनिधी : उमरी तालुक्यातील आदर्श गाव जिरोना ता उमरी जिरोना येथील गट क्रमांक ५२ मधील गायराण जमीन गावकऱ्यांच्या सहमतीने . वन परिक्षेत्र कार्यालय भोकर याच्या कडे ठराव घेऊन वर्ग करण्यात आली आहे , त्यांनी हाद कायम करण्यासाठी भुमी अभिलेक कार्यालयाकडून शासकिय मोजणी करायला पाहीजे होती,ती केली नाही

हदद कायम करताना, शेताच्या सर्वच शेजाऱ्यांना जायमोक्यावर नोटीस तालीम करून हजर राहण्यास ताकीत करावयास पाहिजे होते , असे न करता सर्वच शेतकऱ्यांना अंधारात ठेवून शेरेदार केंद्रे व चौकेदार सोळके, आणि वनमजुर रामचंद्र मामडे यांनी खोदकाम करण्यास सुरुवात केली आहे, हि हद्द कायम केल्याने , गावातील डल , डढ मागास्वर्गीय गोर-गरीब शेतकऱ्याचा गाडीबैल वर खत बीयाने नेण्याचा मार्गच बंद केला आहे. गावातील शेतकरी यांनी केंद्रे शेरेदार व सोळंके चौकेदार वनमजुर याना आम्हा शेतकऱ्यांना शेताकडे बी , बी याने खत , शेतातील माल घराकडे नेण्यासाठी २० फुटाच्या रस्त्या देण्याची मागणी केली . ते म्हणतात की , तुम्हाला एकइंचही रस्ता मिळणार नाही, अगाव जास्त बोलाल तर तुम्हाला जेल मध्ये टाकतो , जास्त हुशाऱ्या करू नका , तुमच्याने काय झालेले करून घ्या, असे धमकी वजा बोलुन शेतकर ऱ्याचा रस्ता बंद केला आहे. आणि ग्रामपंचायत ठराव सर्वानुमते पास करून सामाजिक कार्यक्रम भीमजयंती , बुद्धजयती देश हिताचे कार्यक्रम घेण्या करिता सर्वानुमते ४० आर गायराण जमीन देण्यात आली आहे , त्यापण जागेवर वन अधिकारी यांनी हुकुमशाही प्रवरतीने जातीय द्वेषातून जागेवर कब्जा केला आहे.



### शेरेदार केंद्रे व चौकीदार सोळंके यांची मनमानी

वरिष्ठ अधिकारी याच्या मनमानी कारभाराची चौकशी करून त्याच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करावी. आणि ठरावाप्रमाणे जागेचा ताबा सोडावा, आणि शेतकऱ्यांना रस्ता मोकळा करून द्यावा अशी मागणी समस्त शेतकरी करित आहेत. आणिते त्याच्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी लोकशाही मार्गाने आमरण उपोषण आदोलन करण्याचा इशारा संबंधीत अधिकाऱ्याना निवेदन देऊन रस्ताची मागणी केली आहे.

# बार्टीमध्ये जिजाऊ आणि सावित्री जयंतीचा उत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे /प्रतिनिधी : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे सावित्रीबाई फुले,आणि राजमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांची संयुक्त जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. या जयंती उत्सवात संस्थेतील महिला अधिकारी -कर्मचाऱ्यांना सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज व मा जिजाऊ यांच्या संदर्भातील पुस्तके देऊन सन्मान करण्यात आला.

बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला यावेळी निबंधक विशाल लोंढे, विस्तार व सेवा विभागाचे विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड, विभागप्रमुख शुभांगी पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.रमणी सोनवणे या उपस्थित होत्या. त्यांनी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती दिली. प्रारंभी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ.बबन जोगदंड यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

### पुस्तके आणि गुलाब पुष्प देऊन सर्व महिला अधिकारी कर्मचाऱ्यांचा सन्मान

यावेळी पुढे बोलताना सोनवणे म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मनामध्ये स्वराज्याची ज्योत प्रज्वलित करण्याचे काम माँ जिजाऊंनी केली, त्यामुळे स्वराज्य साकार झाले. तसेच राष्ट्र उभारणीचा पाया त्यानी रचला असल्याचे सांगून आजच्या महिलांनी त्यांचे विचार पुढे घेऊन जाणे ही काळाची गरज असल्याचे त्या म्हणाल्या. या वेळी निबंधक विशाल लोंढे यांनी जिजाऊ यांचे कर्तुत्व अलौकिक स्वरूपाचे असून त्यांच्या कार्याची प्रेरणा आजच्या मुलींनी घेण्याची गरज आहे, असा संदेश दिला. विभाग प्रमुख शुभांगी पाटील यांनी राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्री यांच्या कार्याला जगभरात तोड नाही, असे सांगितले. यानंतर

प्रबोधनकार अभिनेत्री मेघना संजय झुझम यांनी मी तुमची सावित्रीबाई फुले बोलतोय हे एकपात्री नाटक प्रयोग सादर करुन महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय जीवनातील अनेक आठवणीना उजाळा दिला. आजच्या स्त्रीनी सावित्रीमाई फुले, महात्मा फुले, यांचा समतेचा विचार पुढे नेण्यासाठी काम करावे असे आवाहान केले. त्यांच्या एकपात्री प्रयोगाला प्रचंड दाद मिळाली.



गौरी सोनवणे, उषा भिंगारे, जागृती गायकवाड, तेजस्वी सोनवणे यांनी सावित्रीमाई फुले यांची ओवी सादर केली.

बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी या प्रसंगी उपस्थित होते.

सूत्रसंचलन वैशाली खांडेकर यांनी केले. आभार रामदास लोखंडे यांनी मानले.


## ग्रामीण संस्कृतीचे दर्शन, अर्थकारणाचा संगम, करोडोंची उलाढाल

# दोनशे वर्षांहून अधिककाळ सांस्कृतिक परंपरा जपणारी म्हसा जत्रा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठी मुरबाड तालुक्यातील म्हसा गावची 'म्हसा जत्रा' प्रसिद्ध समजली जात असून ,सद्या म्हसा जंत्रेत गर्दीला उधाण आले असून महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचा एक मोठा उत्सव, जिथे व्यापार, श्रद्धा आणि संस्कृती यांचा मेळ साधला जात असून ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, मुंबई, पालघर यांसारख्या जिल्ह्यांतून तसेच शेजारच्या राज्यांमधूनही लाखो भाविक आणि व्यापारी म्हसा जत्रेत दाखल झाले आहेत. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील म्हसा गावात खांबलिंगेश्वर (म्हसोबा) देवाच्या नावाने ही जत्रा भरते. दरवर्षी पौष पौर्णिमेला (जानेवारी महिन्यात) या यात्रेला सुरुवात होते. साधारणपणे १५ ते २० दिवस ही जत्रा सुरू असते. तर सद्या जत्रेसाठी येणाऱ्या भाविकांच्या लांबच, लांब रांगा पाहायला मिळत आहेत. तर दोनशे वर्षांहून अधिककाळ पारंपरिक स्वरूपात सांस्कृतिक परंपरा जपणारी म्हसा जत्रा असून, ग्रामीण संस्कृतीचे दर्शन, अर्थकारणाचा संगम, करोडोंची उलाढाल म्हसा जत्रेतून पाहायला मिळत आहे.तर अनेक युट्युबर म्हसा जत्रेत दाखल झाले असून,सांस्कृतिक परंपरा जपणारी म्हसा जत्रेचे अनेक व्हिडिओ सद्या सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहेत. म्हसा परिसरात शेतात,माळरानावर चुलीवरचे पारंपरिक पद्धतीने रात्रीचे जेवण करतांना भाविक दिसून येत आहेत.



ही यात्रा ग्रामीण संस्कृती, श्रद्धा आणि अर्थकारणाचा संगम आहे, जिथे करोडोंची उलाढाल होत असते. म्हसा जत्रेत य घोंगड्या, ब्लँकेट, चादरी, चिनी मातीची बैल जोडी, खेळणी, मिठाई, खाजा, पेढे आणि इतर अनेक वस्तूंची दुकाने असतात. सद्या हिवाळ्याचे दिवस असून, मोठ्या प्रमाणात घोंगड्या , ब्लँकेट,स्वेटर, चादरींची मोठ्या प्रमाणात मागणी दिसून येत असून, नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. तर याच साहित्यासाठी म्हसा जत्रा प्रसिद्ध समजली जाते. शिवाय बांबूच्या टोपल्या, झाडाच्या खोडापासून तयार केलेला उखळ, कोयते, कुदळ, विळे असं शेतीला उपयोगी पडणाऱ्या साहित्याची मोठ्या प्रमाणात शेतकरी खरेदी करताना दिसत आहे.म्हशाच्या जत्रेत मिळणारे हातोळी खाजा, गुलाबजामुन हे गोड पदार्थही मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध असून, गोड पदार्थ खाण्यासाठी देखिल नागरिकांची गर्दी दिसून येत आहे. दोनशे वर्षाहून अधिक ही म्हसा यात्रा आजपर्यंत निरंतर चाललेली आहे असे ज्येष्ठ नागरिकांचे म्हणणे आहे. यात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे शेकडो वर्षांपासून चालत आलेला बैल बाजार, जिथे महाराष्ट्रासह इतर राज्यांमधूनही लाखोंच्या संख्येने शेतकरी बैल खरेदी-विक्रीसाठी येतात, तसेच विविध वस्तूंची दुकाने, खेळणी आणि मनोरंजनाचे साहित्य खरेदीसाठी नागरिकांची गर्दी दिसून येत आहे.

म्हसा जत्रा या काळात मोठ्या प्रमाणावर होणारी भाविकांची गर्दी आणि वाढत्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने वाहतूक नियंत्रणासाठी विशेष उपायोजना राबविण्यात येत आहेत. ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या प्रस्तावावरून जारी करण्यात आलेल्या या आदेशानुसार, जत्राकाळात काही प्रमुख मार्गांवर वाहने थेट प्रवेश करू शकणार नाहीत, तर वाहतूक सुरक्षितपणे वळविण्यासाठी पर्यायी रस्त्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. हे वाहतूक बदल १७ जानेवारी २०२६ रोजी रात्रीपर्यंत प्रभावी राहणार आहे. नागरिक, वाहनचालक आणि जत्रेला येणाऱ्या भाविकांनी शिस्त पाळून वाहतूक व्यवस्थेला सहकार्य करावे, पर्यायी मार्गांचा वापर करावा आणि जत्रा सुरक्षित, सुरळीत आणि शांततेत पार पाडण्यासाठी नियमांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.